


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७५१. वा | गुरूवार | दि. २५ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बुलढाण्याच्या आमदाराला थापा मारण्याची सवयच...

## शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचा आ.संजय गायकवाड यांच्यावर घणाघात



**जनसंचलन/बुलढाणा**

कष्टाने आणि घाम गाळत एका दाण्याचे हजार दाणे करणाऱ्या शेतकरी दाम्पत्याच्या पोटी माझा जन्म झाला आहे. त्यामुळे मी काहीही झाले तरी शेतकऱ्यांशी गद्दारी करणार नाही. मी शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठीच लढत राहणार. माझ्यावर जे कोणी खोटे आरोप करतात, त्यांना मी गांभीर्याने घेत नाही. बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड हे दिवसाढवळ्या थापा मारतात. त्यामुळे त्यांना आता जिल्ह्यातील जनता अजिबात गांभीर्याने घेत नाही, असा घणाघाती आरोप अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर यांनी केला. दोन दिवसांपूर्वी आमदार संजय गायकवाड यांनी रविकांत तुपकर यांच्यावर विविध प्रकारचे आरोप केले होते. रविकांत तुपकर हे महागडे कपडे घालतात, शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्या गाढे बंधूंना तुपकरांनी वाचवण्याचा प्रयत्न केला, अशाप्रकारचे आरोप गायकवाडांनी केले होते. गायकवाडांच्या या आरोपांना बुधवारी झालेल्या प्रचार सभेत रविकांत तुपकर यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. तुपकर यांनी या वेळी केलेल्या फटकेबाजीत गायकवाडांवर प्रचंड शरसंधान केले. तुपकर म्हणाले की, बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड हे आरोप करण्यात पटाईत आहेत. ते माझ्यावर शेतकऱ्यांशी गद्दारी केल्याचा व शेतकऱ्यांना लुबाडणाऱ्यांना वाचवण्याचा आरोप करीत आहेत. परंतु वस्तुस्थिती ही आहे की, खुद्द गायकवाड यांनीच एका महिलेची फसवणूक करून तिची जमीन हडप केली व त्या ठिकाणी स्वतःचा फार्म हाऊस उभा केला.शेकडो एककर जमीन हडपली गायकवाड आज काय बोलतील आणि उद्या काय बोलतील याचा काहीच नेम नाही. तुपकर पुढे म्हणाले की, आमदार संजय गायकवाड यांना फेकाफेकी करायची सवय आहे. काही दिवसांपूर्वी गायकवाड यांनी दावा केला होता की, १९८७ साली त्यांनी एका वाघाची शिकार केली आणि त्याचा दात ते गळ्यात घालून फिरत आहेत. नंतर जेंव्हा या विषयाची पोलखोल झाली, तेंव्हा त्यांनी सांगितले की नाही हा दात प्लास्टिकचा आहे. जे लोक दुसऱ्यांना लुबाडून खातात, त्यांनी कमीत कमी आमच्यावर आरोप करू नये. मी कष्ट करून आणि घाम गाळून जीवन जगणाऱ्या दाम्पत्याच्या पोटी जन्माला आलोय. मी शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढत राहणार आहे. शेतकऱ्यांनी मी कधीही गद्दारी करू शकत नाही. महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांचा पराभव दिसू लागल्याने सध्या आमदार गायकवाड माझ्यावर बेछूटपणे आरोप करीत आहेत. माझ्यावर अशाप्रकारचे निखालस खोटे व घाणेरडे आरोप करण्यासाठी मंत्री उदय सामंत व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना आदेश दिल्याचा दावाही तुपकरांनी आपल्या भाषणात केला

# लोकप्रतिनिधींनो जरा प्रचारातून वेळ काढून, शेतकऱ्यांकडेही लक्ष द्या!

## कालच्या अवकाळी पावसाने खामगाव - शेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला!

**जनसंचलन/ खामगाव**

कालच्या अवकाळी पावसाने खामगाव सह शेगाव तालुक्यातील काही गावात जोराच्या वाऱ्याने अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली आहेत. काही ठिकाणी गारपीट झाल्याने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला आहे. काल दुपारी अचानक अवकाळी पावसाने खामगाव सह शेगाव तालुक्यातील पातोंडा, अटाळी, रामनगर, विहिगाव, आंबेटाकळी, आवार,किन्हीमहादेव,या गावात हाहाकार माजवला होता.अनेक ठिकाणी रस्त्यात झाडे पडल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. खामगाव तालुक्यासह शेगाव येथील कांदा, ज्वारी, तीळ, उन्हाळी मूग, मका, उत्पादक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला खास अवकाळी पावसाने हिरावून घेतला आहे. अनेक ठिकाणी गोरगरिबांची पत्र्याचे घरे उडून गेल्याने त्यांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. बऱ्याच ठिकाणी रस्त्यात झाडे पडल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. मायबाप सरकारने स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रचारातून वेळ काढून शेतकऱ्यांच्या बांधावर



जाऊन लवकरात - लवकर सर्वे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी अशी मागणी सामान्य कांदा ,गहू ,ज्वारी मका उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

# निंबाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह...

**जनसंचलन/शेगाव**

तालुक्यातील गौलखेड येथे शेत शिवारातील निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशन कडून मिळालेल्या माहितीनुसार, आज बुधवार दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी गौलखेड येथील पंडित साहेबराव सोनोने वय ३२ वर्ष यांनी शेगाऐ ग्रामीण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे की, मौजे गौलखेड तालुका शेगाव येथील रहिवासी भारत प्रल्हाद बोदडे वय ५५ वर्ष यांनी गौलखेड येथील नावकर यांच्या मळ्याजवळील असलेल्या निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. अशी माहिती पोलीस पाटील गजानन



डाबेराव यांना फिर्यादी यांनी फोन करून दिली. फिर्यादीच्या तोंडी तक्रारीवरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाची प्राथमिक चौकशी पोलीस उपनिरीक्षक गजानन शिंदे यांच्याकडे असून अधिक तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल अनिल बरिंगे हे करीत आहेत.

# उत्कर्ष महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ थाटात संपन्न...

## विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे मेहनत करून यश संपादन करावे, कारण यशस्वी होणे हाच उत्कर्षचा मूलमंत्र : सह सचिव सिद्धार्थ खरात

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

येथील उत्कर्ष फाउंडेशन संचलित उत्कर्ष कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा पदवी वितरण समारंभ दि. २० एप्रिल २०२४ रोजी पार पडला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सहसचिव सिध्दार्थजी खरात, प्रमुख अतिथी प्राचार्य निलेश गावंडे, प्रेरणादायी वक्ते. हेमंत भांगे.गोविंद गोंडेपाटील प्राचार्य डॉ. उत्तम अंभोरे, प्राचार्य सुनील सुरुले, संस्थेचे सचिव भास्कर गवई कोषाध्यक्ष.गंगाधर खरात,प्राध्यापक व इतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.प्राचार्य सुनील सुरुले यांनी प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाची वाटचाल सांगत असताना म्हटले की, उत्कर्ष फाऊंडेशन संचलित, उत्कर्ष कला, वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना २०२० मध्ये करण्यात आली. महाविद्यालयाने तीन वर्षाच्या कालावधीमध्ये जी शैक्षणिक प्रगती केली, त्याचीच परिपूर्ती म्हणून हा प्रथम पदवी वितरण समारंभ संपन्न झाला. त्यानंतर पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना विविध मान्यवरांच्या शुभहस्ते पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य निलेश गावंडे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी स्थानिक पातळीवर उपलब्ध झालेल्या शैक्षणिक संकुलाचा लाभ घेऊन आपल्या जीवनात यशस्वी व्हावे, असे आवाहन केले. तसेच प्रेरणादायी वक्ते हेमंत भांगे (पुणे) म्हणाले, स्वतःचे ध्येय प्राप्त करण्यासाठी आवड, जिद्द, वचनबध्दता व योग्य दृष्टिकोण ठेवून विद्यार्थ्यांनी प्रयत्न करायला हवे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी सिद्धार्थजी खरात म्हणाले की, विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे मेहनत करून यश संपादन करावे, कारण यशस्वी होणे हाच उत्कर्षचा मूलमंत्र आहे. या भागातील उच्चशिक्षण घेवू इच्छिणा-या विद्यार्थ्यांना उत्कर्ष महाविद्यालयाने यशस्वी करण्याचा निर्धार केला आहे.



त्यासाठी युजीसीच्या नियमाप्रमाणे उच्चशिक्षित पात्रताधारक प्राध्यापकांची विद्यापीठ समितीमार्फत निवड केलेली आहे. तसेच इत्यादी नवीन अध्यासक्रम त्याचबरोबर कौशल्य शिक्षणही उपलब्ध करुन दिले आहे. व कोणत्याही परिस्थितीत या भागातील विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभा राहून तो यशस्वी कसा होईल, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची हमी महाविद्यालय घेईल व आवश्यक ते सर्व सहकार्य करेल, असे आवाहन सिद्धार्थजी खरात यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. स्नेहांकिता पुंडकर यांनी तर आभार प्रा. वीरेन्द्र तायडे यांनी व्यक्त केले.

# लहान भावाच्या लग्नाच्या ७ दिवसापूर्वीच अल्पशा आजाराने मोठ्या भावाचे निधन

**जनसंचलन/ उदयनगर**

लहान भावाच्या लग्नाच्या अवघ्या ७ दिवसा पूर्वीच मोठ्या भावाचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. सदर घटना उदयनगर येथे २२ एप्रिल रोजी सायंकाळी उशिरा घडली या घटनेमुळे उदयनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अकोला जिल्ह्यातील व्याळा येथील मूळ रहिवासी असलेले गजाननभाऊ उगवेकर यांचे कुटुंबीय गेल्या अनेक वर्षा पासून उदयनगर येथे स्थायिक झालेले असून गुण्या गोविंदाने वास्तव्यास असुन येथे फर्निचर दुकानच्या माध्यमातून मोल मजुरी करून संसाराचा गाडा चालवीत गजानन उगवेकर यांचे गोपाल व शुभम दोघेही सोज्वळ स्वभावाचे असल्याने त्यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत व्यवसायात दिवसागणिक प्रगती केली. गोपालने मित्र रुपी विश्व निर्माण केले तरलहान भाऊशुभम चे लग्न २९ एप्रिल रोजी होते त्या लग्नाची सर्वतयारी गोपालने केली एवढ्या ४१ ते ४२ अंश सेल्सिअस मध्ये गोपालने दुचाकीने फिरून शुभम च्या लग्नाच्या निमंत्रण पत्रिका आप्तेष्टांना घरोघरी जाऊन पोहोच केल्या तर उदयनगर येथे ही अनेकांना निमंत्रण पत्रिका दिल्या सर्व तयारी लग्नाची गोपालने करून घेतली अन् नियतीच्या मनात काय दडलय याची पुसटशीही कल्पना कोणाला नसतांना अचानक गोपाल ला त्रास होऊ लागला म्हणून तात्काळ उदयनगर नंतर चिखली व पुढील उपचारासाठी संभाजीनगर येथे दाखल केले तेथे गोपाल वर शस्त्रक्रिया सुद्धा झाली आता तब्येत बरी झाली वाटत असतांना अचानक २२ एप्रिल रोजी रात्री गोपालची प्राणज्योत मालवली त्याचे वर अत्यंत दुःखद वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले लहान भावाच्या लग्नाची तयारी मोठा भाऊ गोपालने पूर्ण केली अन अचानक अल्पशा आजाराने गोपालचे निधन झाले. उगवेकर परिवारावर दुःखाचा डोंगरकोसळला गोपाला हा अत्यंत मनमिळाऊ व सोजळ स्वभावाचा असल्याने सर्वांशी त्याचे जिवाळ्याचे संबंध होते त्यामुळे हळहळ व्यक्त होत असून त्याचे पश्चात आई-वडील, भाऊ, बहीण, पत्नी, ६ वर्षीय मुलगी व २ वर्षाचा मुलगा असा परिवार असून तो परिवार आता पोरका झाला आहे

# बुलढाणा लोकसभेसाठी होणार ७० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान-जिल्हाधिकारी किरण पाटील

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हाधिकारी कर्यालयात झालेल्या पत्रकार परिषेदेत जिल्हाधिकाऱ्यांनी माध्यमांशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी बोलतांना सांगितले की, बुलढाणा लोकसभेसाठी ७० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान होईल असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी व्यक्त केला आहे. भारत निवडणूक आयोगाने मार्च रोजी लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. शुक्रवार, २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. ११०४ ठिकाणी स्थापित १९६२ मतदान मतदान केंद राहणार आहे. शहरी भागात ३८१ तर नागरी भागात १५८१ मतदान केंद्र राहणार आहे. यातील ९८७ मतदान केंद्राचे : वेबकास्टींग करण्यात येणार आहे. बुलढाणा लोकसभा निवडणुकीसाठी २१ उमेदवार असल्याने दोन मतदान यंत्र लागणार आहेत. या मतदान प्रक्रियेसाठी जिल्हा निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. यावेळी १८ ते १९ वर्षे वयोगटातील नव्याने नोंदणी केलेले २६ हजार ५०० मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. लोकसभा मतदारसंघासाठी २७८२मदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार संघात ९ लाख ३३ हजार १७३ पुरुष तर ८ लाख ४९ हजार ५०३ महिला आणि २४ तृतीयपंथी मतदारांची नोंद झाली आहे. यात दिव्यांग १४ हजार २३४, ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक २६ हजार ८३०, तर ४ हजार ३९५



सैन्यदलातील मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान केंद्रावर मतदारांना रांगेत उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही, याठिकाणी रांगविरहीत मतदानासाठी टोकन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. मतदारांना रांगेत उभे ठेवण्याऐवजी मतदान केंद्रालगत असलेल्या स्वतंत्र कक्षामध्ये बैठक, बीज, पंखे, पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. टोकन क्रमांकानुसार मतदानासाठी केवळ पाच मतदारांना रांगेत उभे ठेवण्यात येणार आहे.

# शेतीच्या वादातून त्याने केली कुऱ्हाडीने मारहाण

**जनसंचलन/शेगाव**

तालुक्यातील जावळा पळसखेड येथे शेतीच्या वादातून एकाला कुऱ्हाड मारल्याची घटना २३ एप्रिल रोजी घडली आहे. याबाबत गजानन चिंतामण मोरे, वय ४८ रा. जवळा पळसखेड यांनी शेगाव ग्रामीण पोलिसात फिर्याद दिली की, माझे शेत आरोपी दिपक रामभाऊ खोंड यांच्या भावाने ५ लाख रुपयात खरेदी करुन घेतलेले आहे. मी एकुण ८ लाख ७५ हजार रुपये देवुन खरेदी करण्यासाठी शेत परत मागीतले पण त्याने टाळाटाळ केली. २३ एप्रिल रोजी फिर्यादी हा आरोपीचे घरासमोर रोवन यारोपिस माये पोन परत दे असे म्हटले असता आरोपीने तुं शेताचे १२ लाख ७५ हजार रुपये दे व तुझे शेत परत घे असे म्हणुन वाद घातला व शिवीगाळ करुन धमक्या



दिल्या. फिर्यादीने आरोपीस मी शेताचे रुपये तुम्हाला परत दिलेले आहे असे म्हणताच आरोपीने तुझे हात पाय छाटुन टाकतो असे म्हणुन घरातुन कु- हाड आणुन तिचे डावे हाताचे मध्यभागी मारुन जखमी केले आहे. अशा फिर्यादीचे दवाखान्यात दिलेल्या जबाबावरुन व मेडीकल सर्टिफिकेटवरुन आरोपी विरुद्ध कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि नुसार गुन्हा दाखल केला आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मोताळा येथे किरकोळ कारणावरून एकास कुऱ्हाडीने मारहाण...

**जनसंचलन/मोताळा**

किरकोळ कारणावरून एकास डोक्यात कुऱ्हाड मारून जखमी केल्याची घटना १९ एप्रिल रोजी संध्याकाळी कॉटन मार्केटच्या गोडाऊन नजीक घडली. याप्रकरणी २२ एप्रिल रोजी तक्रारीवरून दोन जणांविरुद्ध बोराखेडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॉटन मार्केटच्या गोडाऊनच्या पाठीमागे राहणाऱ्या राजू भास्कर शिंदे यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यानुसार १९ एप्रिल रोजी संध्याकाळी आप्पू चंपालाल सोळंके आणि त्यांची पत्नी माली आप्पू सोळंके यांना घरातील लाईटचा आकडा राजू शिंदे यांनी टाकू दिला नाही. या कारणावरून दोघांनी शिंदे




यांना शिवीगाळ केली तर आप्पू सोळंके यांनी डोक्यात कुऱ्हाड मारून जखमी केले तसेच दोघांनी संगनमताने जीवे मारण्याची धमकी दिली अशी राजू शिंदे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या तक्रारीवरून पोलिसांनी आप्पू चंपालाल सोळंके आणी माली आप्पू सोळंके या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# कामगार मतदारांना मतदानासाठी सुट्टी...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा मतदारसंघामध्ये दुसऱ्या टप्प्यात दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या आदेशानुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदानाच्या दिवशी सुट्टी देण्यात येणार आहे. निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचाऱ्यांना ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे.सदर सुट्टी उद्योग, उर्जा आणि कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने आदींना लागू राहणार आहे. खासगी कंपन्यांमधील आस्थापना, सर्व दुकाने आणि इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना, तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स रिटेलर्स यांना हा आदेश लागू राहणार आहे. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी आदींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसल्यास मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टीऐवजी केवळ दोन ते तीन तासाची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, बुलडाणा यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. उद्योग, उर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने,



दुकाने आदींच्या मालक, व्यवस्थापनांनी सूचनांचे योग्य अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरीता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त झाली नाही आणि मतदान करता येणे शक्य झाले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. बुलढाणा मतदारसंघातील सर्व कामगारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी सर्व प्रकारच्या आस्थापनाधारकांनी भरपगारी सुट्टी द्यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी यांनी केले आहे.

# पांढरदेव शिवारात गारपिटमुळे कांदा शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील मौजे पांढरदेव शिवारात गट नंबर ९०मधील शेतकरी दामोधर आयाजी म्हस्के यांनी शेतामध्ये कांदा लागवड केली होती कांदा पिकामुळे आपल्या संसारामध्ये काहीतरी काया पालट होईल या आशावर शेतकरी आपले नियोजन करीत होतो दर वर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा कांदा लागवड केली होती परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे काल झालेल्या अवकाळी पावसामुळे गारपीटीमुळे पांढरदेव येथील शेतकरी दामोदर आयोज मस्के यांचे स्वप्न धुळीस मिळाले आहे त्यांनी कांद्यासाठी व मशागतीसाठी भरपूर खर्च केला होता परंतु आसमानी संकटासमोर



शेतकऱ्याचे काही चालले नाही काल झालेल्या पावसामध्ये पांढरदेव येथील मस्के यांचे गट नंबर ९० मधील ५० गुंठ्याचा कांदा हा भुईसपाट झाला आहे त्यामुळे त्यांच्यावर आसमानी आणि सुलतानी संकट आले आहे

# ६५ फूट उंचीवर शिवविवाह...

**जनसंचलन/बुलडाणा**

लेक माझी ही संकल्पना घेऊन वैवाहिक सोहळ्याला साहित्यिक व सांस्कृतिक झालर चढवत पारंपारिकता अन् आधुनिकता यांचा सुंदर समन्वय साधून मातृतीर्थ बुलढाणा शहरात पत्रकार राजेंद्र काळे यांच्या मुलीचा झालेला विवाह सोहळा ऐतिहासिक ठरला तो, फुलांनी सजवलेल्या क्रेनमधून ६५ फूट उंचीवर जात साजरा झालेल्या अनोख्या शिवविवाहाने ! संगम चौकातील भव्यदिव्य शिवस्मारक स्थळी २१ एप्रिलला मावळत्या सूर्याच्या साक्षीने चि. सौ. का. प्रतिक्षा व चि. संदीप यांच्या वैवाहिक आयुष्याचा सूर्योदय झाला. क्रेनच्या झुल्यातून आकाशाकडे झेपवत गगनचुंबी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सद्यस्थितीतील भार-



तातील सर्वाधिक उंच पुतळ्याला पुष्पाभिषेक करत शिवसाक्षीने त्यांनी मुहूर्त साधला. तर तिकडे निवांत लॉनसवर लेक माझीचा जागर करत भरगच्च उपस्थितीत मंगलध्वनीच्या गजरात साजरा झालेला पुढचा विवाह सोहळा संस्मरणीय ठरला. स्वागतपथावर लावलेल्या लेकीविषयीच्या कवितांचे फलक लक्षवेधी होते, वृक्षारोपण करून हळद समारंभ तर पक्षी तृष्णापात्रामध्ये एक लोटा जल टाकून संगीत सोहळा.. हेही आधीचे पर्यावरणपूरक वैशिष्ट्य. शेवटी मतदान करून लोकशाहीच्या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहनही प्रतीक्षा व संदीप यांनी केले.

# आसोला बुद्रुक येथे गोठयाला लागली आग लाख रुपयाचे नुकसान शेतकरी शासनाच्या अनुदानच्या प्रतीक्षेत

**जनसंचलन/चिखली**

चिखली तालुक्यातील मौजे असोला बुद्रुक येथे कोठयाला आचनक आग लागुन आसोला बुद्रुक येथील गट नंबर ७२ येथील रवींद्र देविदास नवले यांच्या गोठ्याला सकाळच्या सुमारास आग लागली त्यामध्ये दोन स्पिंकलर पाईप सट ४० पि यु सी पाईप गुरांचा चारा व शेती विभागीय साहित्य असे एकूण लाख रुपयाचे नुकसान झाले आहे त्या ठिकाणी कृषी विभागाचे कृषी साहित्य आसोला गावचे तलाठी लखन जाधव तसेच असोला बुद्रुकचे कृषी सहाय्यक किंगर साहेब व इतर प्रशासकीय अधिकारी येऊन यांनी पंचनामा केला आहे तरी माननीय शासन या



शेतकऱ्याला काय मदत करते याकडे सर्व लोकांचे लक्ष लागून आहे

# वीज पडून वयोवृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू

**जनसंचलन/ पिंपळगाव सराई**

शिरपूर येथील बापूराव भिकाजी हिवाळे (७०) यांचा मंगळवारी शेतात काम करत असताना वीज पडून मृत्यू झाला. मंगळवारी सोनेवाडी शिवारातील त्यांच्या शेतात ते काम करत असताना, अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस आला. या दरम्यान बापूराव भिकाजी हिवाळे हे शेतातील झाडाच्या



आश्रयाला गेले. त्यावेळी विजेचा कडकडाट होऊन त्यांच्या अंगावर वीज पडल्याने त्यांचा मृत्यू झाला.

# लोकसभेची गरज, त्या ११ जागांवर नजर जूनमध्ये कोण कोण ॲडजस्ट होणार?

**वृत्तसंस्था/मुंबई**



लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यासाठी अनेक मतदारसंघांमध्ये राजकीय तडजोडी सुरू आहेत. लोकसभा निवडणुकीत केलेल्या मदतीच्या बदल्यात बड्या नेते मंडळींकडून अनेकांना विधान परिषदेचं गाजर दाखवण्यात येत आहे.लोकसभेला आम्हाला सहाय्य करा. तुम्हाला विधान परिषदेवर संधी देऊ, असा शब्द सध्या दिला जात आहे. एखाद्या स्थानिक नेत्याला विधानसभेत संधी देता येणं शक्य नसल्यास त्याला विधान परिषदेचं आश्वासन देण्यात येत आहे. जूनमध्ये विधान परिषदेची निवडणूक आहे. तिथे तुम्हाला संधी देऊ, निवडून आणू, असे राजकीय करार केले जात आहेत.विधान परिषदेतील ११ आमदारांचा कार्यकाळ २७ जुलैला संपणार आहे. साधारणत: मुदत संपण्याच्या महिनाभर परिषदेची निवडणूक होत असते. ते पाहता जूनच्या अखेरीस ११ जागांसाठी निवडणूक होईल. लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागेल. त्यानंतर विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला १० जूनपासून प्रारंभ होईल. या अधिवेशन काळात किंवा ते संपल्यानंतर लगेच विधान परिषदेची निवडणूक घेण्यात येईल. आमदारकीचा शब्द ज्यांना देण्यात आला आहे, त्यांना खरंच सध्या दिली गेल्यास सध्याच्या ११ आमदारांपैकी अनेकांना संधी नाकारली जाईल. विधान परिषदेची एकूण सदस्य संख्या ७८ इतकी आहे. राज्यपाल नियुक्त १२ जागा अद्याप तरी भरण्यात आलेल्या नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर पाठवायच्या ९ जागा आधीच रिक्त आहेत. तर आणखी १० जागा लवकरच रिक्त होणार आहेत. या १० जागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून गेलेले आमदार आणि शिक्षक, पदवीधर मतदारसंघांतून निवडून गेलेल्या आमदारांचा समावेश आहे.विधानपरिषदेचे आमदार विधान परिषद निवडणुकीत मतदान करतात. विजयासाठी किती मतं मिळवावी लागणार याचा कोटा निश्चित केला जातो. प्रत्यक्ष मतदानातील वैध मतं गुणिले १०० भागिले रिक्त जागा, अधिक २ या सुत्रानुसार हा कोटा ठरवला जातो. महायुतीचं विधानसभेतलं संख्याबळ पाहता ११ पैकी ८ जागा त्यांच्या पारड्यात जाऊ शकतात.

# राष्ट्रीय कर्तव्य बजावलं ते मतदान ठरलं अखेरचं, मतदानाच्या तीन तासात घेतला अखेरचा श्वास

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यामध्ये २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्याचं मतदान होणार आहे. यापूर्वीच वयोवृद्ध मतदारांचे मतदान घरी जाऊन संबंधित यंत्रणा करून घेत आहे. त्याची प्रक्रिया देखील बुलढाणा जिल्ह्यात सुरू झाली आहे. याअंतर्गत एका वयोवृद्ध मतदार महिलेचा मतदान केल्यानंतर मृत्यू झाला आहे. काय आहे संपूर्ण प्रकरण जाणून घेऊया. सध्या संपूर्ण देशात लोकसभा निवडणूक २०२४ ची धूम आहे. यासाठी निवडणूक आयोग दिवसरात्र एक करत आहे. एकही व्यक्ती मतदानापासून वंचित राहू नये याची काळजी घेतली जात आहे.यासाठी ग्राम पंचायतीच्या कर्मचाऱ्यापासून तर निवडणूक आयोग दिल्लीपर्यंतचे अधिकारी मेहनत घेताना दिसत आहेत. घरपोच मतदान सुविधेचे परिणाम ही चांगले येत आहेत. त्यातच एक दुख:द बातमी समोर आली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील पातुडाँ येथील वयोवृद्ध महिलेने दुपारी १२ वाजता मतदानाचा हक्क बजावला आणि त्याच दिवशी ३ वाजता त्यांनी जगाचा निरोप घेतला. ही घटना लोकसभेच्या दृष्टीने चर्चेची ठरत आहे.मृत्यू हा अटळ आहे, तो कोणालाही चुकला नसून मृत्यू कधीही येऊ शकतो. मात्र, त्यापूर्वी काही तरी चांगले काम करून जावे, अशी म्हण इथे तंतोतंत बसते. निवडणूक आयोगाच्या घर पोच मतदानचा फायदा पातुडाँ येथे झाला आहे. निवडणूक आयोगाने यावर्षीपासून जास्तीत जास्त मतदान झाले पाहिजे आणि मतदानापासून कोणीही वंचित राहू नये, म्हणून ऐतिहासिक पाऊल उचलले आहे८५ वर्षावरील मतदार आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंग (मतदान खोली पर्यंत जाऊ न शकणारे) असलेल्यांना आरामात मतदान करण्याचा पर्याय असेल त्याला पीडब्ल्यूडी असे नाव दिले आहे. कोविड-१९ संकटादरम्यान २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीदरम्यान प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आलेला हा उपक्रम प्रायोगिक पोस्टल मतप्रत्रिकेद्वारे मतदान करण्यात येईल, असे निवडणूक आयोगाने सांगितले. २०२४ च्या लोकसभेमध्ये याची सुरवात करण्यात आली.येथील बुथ क्र २२४ चे अनुसया नारायण वानखडे वय ८६ वर्ष याची अधिसूचना जाहीर झाल्यापासून ५ दिवसच्या आता फ्रॉम १२ डी भरून घेतला व तो निवडणूक असयोगाने पात्र ठरवत त्यांना होम मतदान बाजावण्याचा



हक्क दिला. होम मतदान २१ एप्रिलपासून सुरू झाले होते. या बुथचे बीएलओ संजय सातव यांनी २१ एप्रिलला दुपारी १२ च्या दरम्यान निवडणूक विभागचे कर्मचाऱ्यांना सोबत घेत अनुसया नारायण वानखडे यांचे पोस्टल मतदान करून घेतले आणि दुपारी ३ वाजता त्या वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला.मात्र, जाता जाता त्यांनी आपला मतदानचा हक्क बजावला. हे शक्य झालं ते निवडणूक आयोगाने घेतलेल्या नवीन नियमांमुळे आणि तेवढ्याच तत्परतेणे मतदान करून घेणाऱ्या बीएलओ आणि त्या कर्मचाऱ्यांमुळे. मतदानाच्या गिणतीत एक मतदान वाढले, ही मोठी बाब निवडणूक विभागसाठी आहे. या निर्णयामुळे जास्तीत जास्त मतदान होऊन कोणीही मतदान पासून वंचित राहणार नाही व मताचा टक्का ही वाढेल.

# उपचारासाठी आलेल्या विवाहितेचा विनयभंग

**जनसंचलन/ खामगाव**

सामान्य रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या एका विवाहितेचा विनयभंग करण्यात आला. मंगळवारी ही घटना सामान्य रुग्णालयात घडली. तक्रारीनुसार, खामगाव तालुक्यातील एका गावातील २८ वर्षीय विवाहिता मंगळवारी सकाळी ११ वाजता दरम्यान सामान्य रुग्णालयात उपचारासाठी आली. त्यावेळी एक २७ वर्षीय युवक तिथे मद्यप्राशन करून आला. त्याने



विवाहितेचा वाईट उद्देशाने हात पकडून विनयभंग करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप विवाहितेने तक्रारीत केला. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी युवकाविरोधात भादंवि कलम ३५४ अ, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958